19 DEC 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# १ हजार कोटीच्या निधीसाठी शिवाजी विद्यापीठाचा प्रस्ताव

## जागतिक दर्जाच्या शिक्षण संस्थांच्या निर्मितीसाठी केंद्र शासनाची योजना : देशभरातून २० संस्थांची होणार निवड

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

जागतिक दर्जाच्या उच्चशिक्षण संस्थांच्या निर्मितीसाठी नरेंद्र मोदी सरकारने आखलेल्या महत्वकांक्षी योजनेमध्ये देशभरातून शंभरहून अधिक नामवंत संस्थांनी सहभाग नोंदवला आहे. यामध्ये महाराष्ट्रातून शिवाजी विद्यापीठासह अन्य नऊ विद्यापीठांचा समावेश आहे. देशभरातून २० संस्थांची निवड करून त्यांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी एक हजार कोटी रुपयांचे विशेष अनुदान दिले जाणार आहे. हे अनुदान मिळावे यासाठी शिवाजी विद्यापीठाने सरकारकडे नुकताच प्रस्ताव पाठवला आहे. हा प्रस्ताव मंजूर झाला तर जागतिक पातळीवरील पहिल्या १०० शिक्षण संस्थांमध्ये येण्याचा शिवाजी विद्यापीठाचा मानस आहे.

जागतिक दर्जाच्या उच्चशिक्षण संस्थांच्या निर्मितीसाठी महाराष्ट्रातून दहाहून अधिक संस्थांचा समावेश आहे. यापूर्वी देश व राज्यभर ग्रामीण भागातील विद्यापीठ म्हणून ओळख असलेल्या शिवाजी विद्यापीठाने जागतिक पातळीवरील पहिल्या १०० विद्यापीठात येण्याचा निर्णय घेतला असून, त्यादृष्टीने विद्यापीठ प्रशासन पावले उचलत आहे. नरेंद्र मोदी सरकारने आखलेल्या योजनेतून मिळालेल्या एक हजार कोटी अनुदानातून विद्यापीठातील संशोधन, नवनवीन अभ्यासक्रम, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी प्रवेश, प्राथमिक सोयी-सुविधा, आंतरराष्ट्रीय पातळीवर संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक अदान-प्रदान यासह अन्य विद्यार्थी केंद्रीत सोयी-सुविधांवर भर दिला जाणार आहे.

देशभरातील १०० संस्थांमध्ये १० केंद्रीय विद्यापीठे, २५ राज्य विद्यापीठे, ६ अभिमत विद्यापीठ, राष्ट्रीयदृष्ट्या महत्वाच्या संस्था (आयएनआय) असा दर्जा मिळालेल्या २० शैक्षणिक संस्था, ९ खासगी विद्यापीठे, १६ खासगी अभिमत विद्यापीठांनी सहभाग नोंदवला आहे. जागतिक पातळीवर निवडलेल्या २० संस्थांना 'इन्स्टिट्यूट ऑफ इमिनन्स' असा विशेष दर्जा दिला जाणार आहे. जागतिक पातळीवरील पाचशे उच्चशिक्षण संस्थांच्या यादीत भारतातील शिक्षण संस्थांचा सहभाग क्वचित दिसून येतो. त्यामुळे देशातील २० संस्थांना जागतिक पातळीवरील पहिल्या १०० उच्चशिक्षण संस्थांच्या यादीत आणण्याच्यादृष्टीने सरकार प्रयत्न करीत आहे. त्यासाठी १० सरकारी संस्थांना १ हजार कोटींचा विशेष विकास निधी दिला जाणार आहे. यामध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश असल्याने विद्यापीठ प्रशासनाने शासनाकडे प्रस्ताव पाठवला आहे. सरकारने जर हा प्रस्ताव मंजूर केला तर युजीसीचे कोणतेही बंधन शिवाजी विद्यापीठावर राहणार नाही. विद्यापीठ पातळीवर स्वत:चा अभ्यासक्रम व त्याचा कालावधी, पदवी प्रमाणपत्र देण्याचा अधिकार, पाहिजे तेवढे शुल्क आकारून ३० टक्के परदेशी विद्यार्थ्यांना प्रवेश, परदेशी तज्ज्ञांना प्राध्यापक म्हणून नियुक्ती करण्याचा अधिकार विद्यापीठाला राहणार आहे. शिवाजी विद्यापीठात गेल्या दोन वर्षापासून ग्यान उपक्रमाअंतर्गत परदेशी तज्ज्ञ प्राध्यापकांची व्याख्याने होत आहेत. १०० पैकी २० संस्थांची निवड करण्यासाठी सरकार एक समिती नेमणार आहे. सरकारने घातलेल्या अटींपैकी ४० टक्के सुविधा शिवाजी विद्यापीठात पूर्वीपासून उपलब्ध आहेत. त्यामुळे सरकारने घातलेल्या नियमास शिवाजी विद्यापीठ पात्र ठरेल, असा विश्वास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी व्यक्त केले.

### नरेंद्र मोदी सरकार महत्त्वाकांक्षी योजनेत शिवाजी विद्यापीठ एक स्पर्धक

नरेंद्र मोदी सरकार महत्त्वाकांक्षी योजनेत शिवाजी विद्यापीठ एक स्पर्धक म्हणून सहभागी झाले आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली १ हजार कोटीच्या अनुदानासाठी शिवाजी विद्यापीठाचा प्रस्ताव सरकारकडे पाठवला आहे. या स्पर्धेत यश मिळवून जागतिक पातळीवरील पहिल्या १०० शिक्षण संस्थांमध्ये येण्याचा प्रयत्न करणार आहे. विद्यार्थी केंद्रीत विद्यापीठ अशी ओळख जगाच्या पातळीवर करण्याचा मानस शिवाजी विद्यापीठ प्रशासनाचा आहे.

– डॉ. विलास नांदवडेकर, कुलसचिव

19 DEC 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# भावी अधिकाऱ्यांची प्रयोगशाळा

**समाजाच्या सर्वांगिण विकासामध्ये ग्रंथालयाचे योगदान महत्वपूर्ण असते. त्यांचे समाजाशी अतूट नाते निर्माण होते. शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी आधारवड ठरलेले बॅ. खर्डेकर ग्रंथालयही असेच महत्त्वपूर्ण आहे. ही भावी अधिकाऱ्यांची प्रयोगशाळा आहे.**

**महेश कांबळे**
सीसीआर, शिवाजी विद्यापीठ




कालानुरूप बदलणारे साहित्य, सेवा, वाचक या सर्वांना सामावून घेत आजची ग्रंथालये समृद्ध झाली आहेत. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तसेच वाचनसंस्कृती आणि वाचनव्यवहार याना प्राधान्य देऊन पुढच्या पिढीला सांस्कृतिक पॅकेज देता येईल या उदांत हेतूने ग्रंथालय ही संकल्पना प्रत्यक्षात आली. ग्रंथालयांचे, वाचनालयाचे अस्तित्व हे शहरात "संस्कृतिकपणा" जिवंत असल्याचे उदाहरण मानले जाते, तसेच ग्रंथालये हि खऱ्या सामाजिक संवादाची उत्कृष्ट माध्यमे ठरत आहेत. कोल्हापूरचं भरलेपण अधोरेखित करणारा शिवाजी विद्यापीठाचा विस्तीर्ण परिसर आणि यामध्ये आपले वैशिट्यपूर्ण अस्तित्व जपणारे बॅं. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय.

माजी खासदार बॅं. खर्डेकर हे एक लोकनेते व तितकेच उतुंग व्यक्तिमत्व होत. त्यांच्याच नावाने उभी असणारी ही भरगच्च इमारत. नेटके नियोजन व प्रशस्त आसनक्षमता, नैसर्गिक वातावरण अशी येथील खास वैशिष्ट्ये. मानवाच्या सहज प्रवृत्तीमुळे माणूस

**वैशिष्ट्यपूर्ण नैसर्गिक वातावरण आणि नियोजनामुळे कोणत्याही परीक्षेचा ताण येथे अभ्यास करताना जाणवत नाही, मोकळे वातावरण व तितकीच सुंदर इमारत यामुळे ग्रंथालयाशी भावनिक नातं जुळले आहे.**

**- सई पाटील, विद्यार्थिनी**

सातत्याने नवें काही किंवा नवीन ज्ञानाच्या शोधात असतो, याकामी मदतीला धावतात ती ग्रंथालये, वाचनाची आवड जोपासण्यास ग्रंथालये मदत करतात. म्हणून अशी ग्रंथालये विद्यार्थ्यांना आपल्या ज्ञानाची कवाडे सदैव उघडी ठेवण्यास मदत करतात. जगाच्या कानाकोपऱ्यातील घडामोडींची माहिती येथे मिळते. वाचनाचे महत्व लक्षात घेऊन आजच्या तरुणाईची वाट आपोआपच ग्रंथालयाकडे वळतानाचे सकारात्मक चित्र दिसते आहे.

विद्यापीठातील अभ्यासार्थींना विद्यापीठीय शिक्षणाबरोबरच वाचनाची आवड निर्माण करण्यात ग्रंथालये महत्वाची भूमिका बजावत असतात. ग्रामीण भागातून वेगवेगळ्या क्षेत्रात पुढे येण्यासाटी धडपडणारी तरुणाई जरी 'नेट'करी असली तरी संदर्भांसाठी त्यांना ग्रंथालयाची गरज भासते. तंत्रज्ञानाच्या युगात इलेक्ट्रिक माधयमे वरचढ ठरत आहेत पण त्यामुळे ग्रंथालयांचे महत्व कमी होत नाही.

मानवी जीवनात वाचनाला अनन्यसाधारण महत्व आहे, वाचनामुळे माणूस विचारी बनतो, त्याचे मन सुसंकृत होते, वाचन हे ज्ञानप्राप्तीचे महत्वाचे साधन मानले जाते, यामधूनच तरुण आपला विवेक घडवत असतो, विद्यापीठातील विद्यार्थी शिक्षणाबरोबरच विविध स्पर्धा परीक्षांना सामोरे जातात, स्वतःच्या करिअरच्या वेगळ्या वाटा निर्माण करताना विद्यापीठातील हे ग्रंथालय म्हणजे भावी अधिकारी घडणारी प्रगोयशाळा बनत आहे. बँ खर्डेकर ग्रंथालयाचे विविध उपक्रम हे गेल्या दीडशे वर्षाची महाराष्ट्राची वाचनाची परंपरा जपत असून पश्चिम महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षा अभ्यासाचे "हब" बनत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 DEC 2017
लोकमत



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात सोमवारी आयोजित कार्यशाळेत दिव्यांग सहभागींना मार्गदर्शन करताना बाळासाहेब कामत. व्यासपीठावर डॉ. नंदा पारेकर, डॉ. नमिता खोत व प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के.

# दिव्यांगांना सर्वच क्षेत्रात समान संधी : कामत

## विद्यापीठात अंध विद्यार्थी, शिक्षक कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सर्वसाधारण व्यक्तींच्या बरोबरीने दिव्यांग व्यक्तींना शिक्षणासह सर्वच क्षेत्रात समान संधी उपलब्ध आहे. त्याचा त्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कोल्हापूर समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त बाळासाहेब कामत यांनी सोमवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या समावेशी शिक्षण संसाधन केंद्र (ज्ञानस्रोत केंद्र) व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने अंध विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी विद्यापीठस्तरीय पाच दिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. उद्घाटन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते. कामत म्हणाले, दिव्यांग व्यक्तीने पूर्ण क्षमतेने स्पर्धा परीक्षांसह विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवावा. शासन त्यांना सर्वतोपरी सहकार्यास तत्पर आहे.

यावेळी ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक व कार्यशाळा समन्वयक डॉ. नमिता खोत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी परिचय करुन दिला. सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. नंदा पारेकर यांनी आभार मानले. अलमास पेंढारी यांनी सूत्रसंचालन केले. विविध महाविद्यालयांतील, संस्थेतील, विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर, दिव्यांग कर्मचारी व त्यांचे सहायक अशा ८० जणांनी यावेळी सहभाग नोंदविला आहे. यावेळी प्रा. सी. ए. लंगरे, डॉ. शालिनी लिहीतकर, अविनाश भाले, डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. एस. व्ही. थोरात, एस. आर. बिरजे, ए. बी. मातेकर, शरद पाटील, डॉ. किशोर खिलारे, श्रीधर साळोखे, संग्राम किल्लेदार यांच्यासह ग्रंथालय व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हे मार्गदर्शन करणार...

कार्यशाळेत पुणे विद्यापीठाच्या ॲकॅडेमिक को-ऑर्डिनेटर, सेंटर फॉर इन्क्लुजिव्ह एज्युकेशन, शिक्षणशास्त्र अधिविभागाचे धनंजय भोले, पुणे येथील बुक-शेअर, वेस्ट इंडिया झोन समन्वयक जैनाब चिनीकमवाला, शिवाजी विद्यापीठातील इंग्रजी अधिविभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. मनोहर वासवाणी, सहायक प्राध्यापक डॉ. टी. के. करिकट्टी हे तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. कॉम्प्युटर बेसिक अँड इंग्लिश कम्युनिकेशन या उप विषयावर मार्गदर्शन करण्यात येईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 DEC 2017
पुढारी

# दिव्यांगांना सर्व क्षेत्रांत समान संधी : कामत

## विद्यापीठात पाचदिवसीय कार्यशाळेस प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सर्वसाधारण व्यक्तींच्या बरोबरीने दिव्यांग व्यक्तींना शिक्षणासह सर्वच क्षेत्रांत समान संधी उपलब्ध आहेत. त्याचा त्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त बाळासाहेब कामत यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या समावेशी शिक्षण संसाधन केंद्र (ज्ञानस्रोत केंद्र) व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने अंध विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी विद्यापीठस्तरीय पाच दिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. या कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.


दिव्यांग व्यक्तींसाठी शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची व उपक्रमांची माहिती देऊन कामत म्हणाले, दिव्यांग व्यक्तींना कोणत्याही पातळीवर केवळ शारीरिक व्यंगामुळे दुय्यम वागणूक दिली जाऊ नये, याकडे शासनाचा कटाक्ष आहे. किंबहुना, ते अन्य सर्वसाधारण व्यक्तींच्या तुलनेत इतर बाबतीत सरस असल्याचे दिसते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिव्यांग व्यक्तींसाठी परीक्षा पद्धतीमध्ये त्यांना सुकर असे बदल करण्याचे प्रयत्न विद्यापीठ स्तरावर सुरू असल्याचे सांगितले. यावेळी ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक व कार्यशाळा समन्वयक डॉ. नमिता खोत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी परिचय करून दिला. सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. नंदा पारेकर यांनी आभार मानले. कु. अलमास पेंढारी यांनी सूत्रसंचालन केले. कार्यशाळेस विविध महाविद्यालयांतील, संस्थेतील, विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर दिव्यांग कर्मचारी व त्यांचे सहायक अशा एकूण ८० जणांनी सहभाग नोंदविला आहे.

यावेळी ग्रंथालय व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 DEC 2017
तरुण भारत



कागल : म्हाडाचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे यांना निवेदन देताना संघटनेचे पदाधिकारी.

# विद्यापीठाचे नामकरण छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ असे व्हावे

## विविध संघटनांचे समरजितसिंह घाटगे यांना निवेदन

**प्रतिनिधी**
कागल

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचा नामविस्तार श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ कोल्हापूर असा व्हावा, अशा मागणीचे निवेदन श्री छ. संचार व श्री छत्रपती फोर्स कागल या संघटनेतर्फे कागल तालुक्यातील विविध संघटनांचे प्रतिनिधी व प्रमुख कार्यकर्त्यांनी म्हाडाचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे यांना दिले.

यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अजितसिंह कदम यांनी श्रीमंत छत्रपती शिवरायांच्या कोल्हापूरच्या ऐतिहासिक पराक्रमी भूमित शिवाजी विद्यापीठ असा एकेरी उल्लेख कोल्हापूर जिल्ह्याची स्वाभिमानी जनता खपवून घेणार नाही. जिल्ह्यासह सांगली, सातारा, कोकणसह कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यातील सर्व युवक व सर्व स्तरातील जनता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लाखो सह्याचे निवेदन फॉर्म भरुन देणार असून त्यांना संघटनेच्या व जनतेच्या भावना कळाव्याव्यात, असे सांगितले. यावेळी दिलीपराव घाटगे, किरण कुलकर्णी, विजय संकपाळ, शिवाजी माळकर, अनिल खोत, मदनराव किल्लेदार, नरहरी जोशी, तानाजी माळकर, रमण घाटगे व कार्यकर्ते उपस्थित होते.